# G01/G29/HIS285/BAC445/EE/20160526

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सर्वसाधारण सूचना :**

1. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2. प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3. प्रत्येक उप-प्रश्नांचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
4. 80 गुणांच्या प्रश्नपत्रिकेचे आपल्या शिक्षणक्रमाच्या संरचनेनुसार गुणांत रूपांतर करण्यात येईल.

---

1. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) वैदिक कालीन विवाहाचे कोणतेही पाच प्रकार थोडक्यात स्पष्ट करा. 5

   b) वारकरी सांप्रदायाची पाच वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा. 5

   c) संसदीय लोकशाहीचे मर्म कशात आहे ते थोडक्यात लिहा. 5

   d) पुरातत्वीय साधने कोणती ते लिहून त्या साधनांविषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

   e) आर्य समाजाचे सामाजिक कार्य थोडक्यात विशद करा. 5

2. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) मुस्लीम परंपरेतील सण-उत्सवांची थोडक्यात माहिती लिहा. 5

   b) ब्रिटीश राजवटीचे भारतावर झालेले पाच बरे-वाईट परिणाम थोडक्यात स्पष्ट करा. 5

   c) महाराष्ट्रात कोणकोणत्या ग्राम देवदेवतांचे महत्व आहे, त्याची थोडक्यात माहिती लिहा. 5

   d) उपासना पद्धतीत कोणकोणत्या क्रियांचा समावेश होतो ते थोडक्यात विशद करा. 5

   e) कोणत्याही पाच बलुतेदारांची कामे थोडक्यात लिहा. 5

3. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) वैदिक परंपरेतील कोणत्याही पाच सण-उत्सवांची थोडक्यात माहिती लिहा. 5

   b) समाजाच्या जडणघडणीत संतांच्या कार्याचे महत्व थोडक्यात विशद करा. 5

   c) लोकमान्य टिळकांनी शिवजयंती उत्सव सुरू केला, त्यामागे त्यांची कोणती भूमिका होती ते स्पष्ट करा. 5

   d) समतेची तत्वे थोडक्यात लिहून समतेची कोणतीही तीन रूपे थोडक्यात स्पष्ट करा. 5

   e) ग्रामव्यवस्थेतील वतनी अधिकारी कुलकर्णी याच्या कामाचे स्वरूप थोडक्यात लिहा. 5



http://www.ycmouonline.com

4. खालीलपैकी कोणतेही **चार** उप–प्रश्न सोडवा.

a) स्वतंत्र भारतातील पाच राष्ट्रीय उत्सवांची थोडक्यात माहिती लिहा. 5

b) प्रत्येक नागरिकाची पाच मूलभूत कर्तव्ये कोणती ते थोडक्यात स्पष्ट करा. 5

c) सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीतील म. फुले यांची कामगिरी थोडक्यात स्पष्ट करा. 5

d) स्वातंत्र्यपूर्व काळात कामगार चळवळ निर्माण होण्याची कारणे स्पष्ट करा. 5

e) 'अर्थ' पुरूषार्थाची आवश्यकता स्पष्ट करा. 5



http://www.ycmouonline.com